V.C.https://meet.google.com/mph-jsac-ufk?pli=1&authuser=1

**संक्षिप्त फौ. ख. क्र. ७५७/२०२५.**
**राज्य उत्पादन वि. मोहम्मद हमीद**
**निशाणी– १२ क्रमशः**

सरकारपक्षातर्फे/फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी.
मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नाव – धनराज रतन पवार
वय– ४१ वर्ष, धंदा– जवान व वाहनचालक ब.नं. ७६
नेमणुक – निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथक, नाशिक विभाग, नाशिक, जि. नाशिक.

..........................................................................................

**सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास श्री. एन. पी. मोरे वकीलांमार्फत शपथेवर सुरु.**

मी २९–१०–२०२५ रोजी मी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, विभाग, नाशिक येथे कार्यरत होतो. त्यादिवशी दुय्यम निरीक्षक साहेब श्री. के. बी. धींदळे यांना गुप्त बातमी मिळाली की, निळया रंगाचा आयशर गाडीतुन मदय वाहतुक होणार आहे. व त्या गाडीचा क्रमांक एम एच ४३ वाय ९३९९ वाहतुक होणार असल्याबाबत माहिती मिळाली. त्यानंतर पंच आण्णा आहेर व रोहीत पाटील व निरीक्षक पी. एम. गौडा, दुय्यम निरीक्षक के.बी. धींदळे, सहा. निरीक्षक किरण गांगुर्डे, जवान महेश सातपुते, विलास कुवर, युवराज रतवेकर , राहुल पवार व महिला जवान सुनिता महाजन गुन्हया कामी लागण्या–या साहित्यासह सरकारी वाहन क्रमांक एम.एच. १५ ईए ३०७ या वाहनाने हॉटेल साईप्रसाद, मंगरुळ फाटा, मंगरुळ शिवार, ता. चांदवड, जि.

नाशिक या ठिकाणी दुपारी ४:०० ते ४:३० दरम्यान आलो. त्यावेळी नाशिककडून धुळे कडे जाणारा निळया रंगाचा आयशर येतांना दिसला. त्यावेळी दुय्यम निरीक्षक के.बी. धींदळे यांनी सदर वाहनाला बाजुला घेतले व वाहनचालकाला गाडीत काय आहे याबाबत विचारपुस केली. त्यावेळी त्यांनी गाडीत ऑईल व इलेक्टॉनिक वस्तु असलयाचे सांगीतले. त्यावेळी त्यांनी दोन बिल्टया दिल्या. त्यांना अनुक्रमे **नि.१६ व १७** देण्यात आला. त्यावेळी दुय्यम निरीक्षकांना खात्रीलायक बातमी असल्याने वाहनचालकाचे सहमतीने पंचासमोर त्या निळया रंगाच्या आयशर गाडी क्र. एम.एच. ४३ वाय ९३९९ गाडीच्या कंटेनरचे सिल फोडले. त्या वाहनात खाकी रंगाचे बॉक्स दिसुन आले. त्या बॉक्समध्ये रॉयल ब्ल्यु व्हीस्की प्रत्येकी १८० मी.ली. दिसुन आले. वाहनचालकाला विचारले असता त्यांच्याकडे परवाना व वाहतुक पास नसलयाचे सांगीतले. त्यानंतर वर्दळ असल्याने सदर वाहन निरीक्षक राज्य उत्पादन शुकल विभाग कार्यालय, शरणपुर रोड येथे घेउन गेलो. त्याठिकाणी सर्व बॉक्स उतरवले. त्याबॉक्समध्ये एकुण ५२,८०० रॉयल ब्ल्यु व्हॅस्कीच्या सिलबंद बाटल्या  मिळुन आल्या. सदर मुददेमालाची एकुण किंमत १,४१,२१,०००/- इतकी होती. सदर  गुन्हयात विदेशी दारु, निळया रंगाची आयशर गाडी, मोबाईल हा मुददेमाल जप्त केला होता. सदर मुददेमालातुन १८० मी.ली. च्या दोन बॉटल रासायनीक पृथ्थकरणाकरीता वेगळया काढून घेतल्या व जागेवर सिलबंद केल्या व लेबल वर पंचाच्या स-हयां घेतल्या व सिल लावले होते. त्याठिकाणी पंचनामा केला होता. त्यानंतर मी घटनेबाबत फिर्याद दिली. ती फिर्याद व छापिल प्रथम खबरी अहवाल मला आता दाखवले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा

व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **<u>नि.१८ व १९</u>** देण्यात येत आहे. पकडलेल्या आरोपीचे नाव मोहम्मद अली होते व दुस–याचे नाव अंन्सार होते. आरोपी अंन्सार याला केरळ येथुन आणले होते. पुढील तपास श्री. के.बी. धिंदळे यांनी केला. मी या प्रकरणात सॅम्पल सी.ए. साठी स्वतः नेले होते. आता मला सी.ए. सॅम्पल पाठविण्याचे पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी माझी व के.बी. धींदळे यांची सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. २०</u>** देण्यात येत आहे. बॉटल रासायनिक पृथ्थकरणाकरीता नेले त्यावेळी सिलबंद होते व परीक्षणाकरीता दिले त्यावेळी सिलबंद होते त्यावेळी तेथुन पावती घेतली होती ती **<u>निशाणी २१</u>** वर आहे. गुन्हयातील जप्त मुददेमाल व आयशर गाडी पाहिल्यास मी ओळखु शकतो. मी आरोपींना ओळखतो. दोन्ही आरोपींना आज न्यायालयात (https://meet.google.com/mph–jsac–ufkpli= 1&authuser= 1) मार्फत हजर केले आहे. साक्षीदारांने दोन्ही आरोपींना ओळखले.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री. व्ही. एस. पाटील वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

निशाणी २२ वर आरोपीचे वकीलांनी वकीलपत्र रदद करीत असलयाबाबत पुरसीस दिली आहे. आरोपीचे वकीलांनी अधिवक्ता नियमाअर्तगंत आरोपींना कोणतीही नोटीस दिलेली नाही.

**उलटतपास आरोपी करीता स्वतः**

आरोपींना मोफत विधीसहाय्याबाबत सांगण्यात आले. आरोपींनी त्यांचे वकील उत्कष सोनवणे असल्याबाबत सांगीतले. त्यामुळे आरोपीला मोफत विधीसहाय्यतेची गरज नसल्याचे सांगीतले.

आरोपींनी साक्षीदाराचा उलटतपास नाकारला.

उलटतपास काही नाही.

प्रमाणपत्र : – सदर साक्ष घेतेवेळी आरोपींना न्यायालयातील आवाज ऐकु जात होता व आरोपींचा आवाज न्यायालयाला ऐकु येत होता याची खात्री करण्यात आली व साक्षीदाराची साक्ष आरोपीचे उपस्थीतीत व्हीडीओ कॉन्फरसींगव्दारे (https://meet.google.com/mph-jsac-ufkpli= 1&authuser= 1) नोंदविण्यात आली.

सा.वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्वीकृत

**sd**/-

दि. ०९/०१/२०२६ (एस. एस.छल्लाणी)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी चांदवड.

**निशाणी २५ वरील आदेशावरुन उलटतपास आरोपीतर्फे श्री. एच. एस. जाधव यांचे मार्फत शपथेवर पुढे सुरु**

२. आम्हाला साडे अकरा ते पावणे बाराच्या दरम्यान गुप्त माहीती मिळाली होती. आमच्या कार्यालयात स्टेशन डायरी असते. आमचे कार्यालयात मुव्हमेंट रजिस्टर असते किंवा कसे हे मला माहित नाही. धिंदळे यांनी स्टेशन डायरीला नोंद घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, राष्टीय महामार्ग पुर्व पश्चीम आहे. रस्त् तीन पदरी आहे व मधोमध रस्ता दुभाजक आहे. रस्त्याला सर्वीस रोड आहे. आम्ही साडेबारा वाजता तेथुन निघालो होतो. त्यावेळी आमचेसोबत निरीक्षक पी.एम.गौडा, दुययम निरीक्षक के.बी. धिदळे, सहा. निरीक्षक किरण गांगुर्डे, युवराव रतवेकर, महेश सातपुते, बी.टी. कुवर, महिला कॉस्टेबल सुनिता महाजन, मी स्वतः व दोन पंच होतो. आमच्या कार्यालयापासून घटनास्थळापर्यंत सरकारवाडा, भद्रकाली, आडगांव, नाशिक ग्रामीण, ओझर, पिंपळगाव, वडनेरभैरव, चांदवड हदद लागते. आम्ही कार्यालयापासून निघालो ते घटनास्थळापर्यंत मध्ये कुठेही ट्रॅप लावला व तो सक्सेस झाला असे झाले नाही. आम्ही टोलनाक्यावर थांबून सदर वाहन टोलनाका पास करुन गेले किंवा कसे याबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावर ओझर व त्यापुढे टॉफीक पोलीसांची चौकी आहे. हे म्हणणे खरे आहे की, ब–याच वेळेला टॅफीक पोलीसांना त्याबाबत सांगून बॅरीकेट लाउन टॅफीक थांबवीली जाते व तपासणी केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही टॅफीक पोलीसांना बॅरीकेट लावण्याबाबत व टॅफीक थांबवण्याबाबत सांगीतले नव्हते. साक्षीदार सांगतो की, गाडी उशिराने येणार होती. हे म्हणणे खरे आहे की, गाडी उशिराने येणार होती त्यामुळे आम्ही मध्ये कुठेही थांबलो नाही. आमचे कार्यालय ते घटनास्थळ दरम्यान ६० ते ६५ किलोमीटर अंतर आहे. आम्ही साधारण चार ते साडेचारच्या दरम्यान पोहचलो होतो. घटनास्थळाच्या शंभर मिटर अंतरावर चौफुली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पोहचलो त्यानंतर लगेच वाहन आले नव्हते. त्यावेळी आम्ही त्याठिकाणी बॅरीकेंडस लावले नव्हते. आम्ही चांदवड पोलीसांना कळवले नव्हते व त्यांना बॅरिकेंडस लावण्यास सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, राष्टीय महामार्ग असल्याने त्या रस्त्यावर बरीच गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, महामार्गावर टॅकर, ट्रक व इतर छोटे मोठी वाहनांची वर्दळ सुरु असते. आम्ही रस्त्यावरुन येणारे टॅँकर, ट्रक यांना थांबवून त्यांची तपासणी केली नाही. आम्ही पोहचल्यानंतर अर्धा ते पाउण तासाने साधारण पाच ते सव्वापाच वाजेच्या दरम्यान त्याठिकाणी आयशर कंटेनर आला होता. हे म्हणणे खरे आहे की, महामार्ग असल्याने गाडयांची गती

साधारण ७० ते ८० किलोमीटर प्रती तास असते. सदरचे वाहन साहेबांनी हात दिल्यानंतर जागेवर थांबले होते. साक्षीदार सांगतो की, वाहनाची गती लोड असल्यामुळे कमी होती. आम्ही ज्याठिकाणी उभे होतो त्याठिकाणी सर्वीस रस्ता नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुख्य रस्त्यापासून हॉटेल २०० ते ३०० मिटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, हॉटेलच्या समोर परीसर मोकळा आहे. गाडी थांबवल्यानंतर प्रथमतः गाडीकडे धिंदळे गेले होते. आम्ही गाडीला लागून पाठीमागे होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही चालकाला आमची अंगझडती दिली नव्हती. चालकाच्या अंगझडतीचा पंचनामा केला नव्हता.

पश्न – तुम्ही आयशर कंटेनरचा जागेवर पंचनामा केला नाही ?

उत्तर – आम्ही पंचनामा तेथूनच सूरु केला व वर्दळीची जागा असल्याने व बॉक्स जास्त असल्याने वाहन कार्यालयात नेले होते.

३. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही जागेवर चालकाचा अटक पंचनामा केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक बॉटलवर बॅच क्रमांक व सिरीयल क्रमांक असतो. साक्षीदार सांगतो की, जप्त बॉटलवर तसा क्रमांक नव्हता. जागेवर पकडलेल्या इसमाला सरकारी वाहनाने आमच्या कार्यालयात नेले होते. सदर वाहन महेश सातपुते व विलास कुवर यांनी नेले होते. आम्ही साधारण सहा वाजता घटनास्थळावरुन निघालो होतो व आमचे कार्यालयात पावणेआठ वाजता पोहचलो होतो. कंटेनर व आम्ही सोबतच होतो. त्यावेळी पंच आमच्या सोबतच होते. स्टेशन डायरीला कार्यालयात नोंद केली होती. मी वैयक्तीक नोंद केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीवर स्टेशन डायरी नोंद केल्याबाबत नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीत दि. २९/१०/२०२५ रोजी रात्री ११:४५ वाजेच्या दरम्यान असे नमूद आहे. साक्षीदार सांगतो की, चूकीने रात्री नमूद आहे. मी वाचून फिर्यादीवर सही केली होती. चूकीने फिर्यादीमध्ये नमूद असल्याबाबत तपासी अधिका–याला सांगीतले नव्हते. सही करण्यापूर्वी फिर्याद लिहणा–या ठाणे अंमलदाराला त्याबाबत सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यादिवशी कर्तव्यावर हजर नव्हतो त्यामूळे फिर्यादीवर न वाचता सही केली आहे. कंटेनर खोलल्यानंतर रॅायल ब्ल्यु व्हीस्की व्यतीरीक्त इतर काहीही मूददेमाल नव्हता. बिल्टी जप्त केल्याबाबत पंचनाम्यात उल्लेख केला आहे. बिल्टी जप्त केल्याचा वेगळा पंचनामा केला नव्हता. आता साक्षीदाराला पंचनामा निशाणी २६ दाखवला. त्यात गुन्हयात जप्त केलेल्या मुददेमालात बील्टीचा उल्लेख नाही.

४. गाडीचे लॉक तोडल्याबाबत त्याठिकाणी पंचनामा केला नव्हता. आम्ही गाडीतून सर्व माल खाली काढून त्यानंतर तो मोजला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर माल खाकी कागदी बॉक्समध्ये होता. हे म्हणणे खरे आहे की, माल वेगळा काढल्यांनंतर सदर खाकी कागदी बॉक्सचा वेगळा पंचनामा केला नाही. पाच ते सव्वा पाच हा दिवसाचाच वेळ होता व ब–याच प्रमाणात उजेड होता. त्याठिकाणावरुन ३०० ते ४०० मिटर अंतरावर चांदवड टोलनाका होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणाच्या जवळ खुली जागा व उजेड असल्याने पंचनामा त्याच ठिकाणी करता आला असता. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा कार्यालयाच्या पाठीमागील भागात केला होता. हे म्हणणे खरे नाही की, ज्याठिकाणी माल पकडला त्या जागेपेक्षा पंचनामा केला ती जागा छोटी होती. पंच साधारणतः रात्री बारा वाजेपर्यंत त्याठिकाणी होते. मी फिर्याद बारा वाजण्यापूर्वी रात्री ११ ते ११ः३० दरम्यान केली होती.

५. मी घटनास्थळी गेलो त्यावेळी धिंदळे यांच्या वाहनात सरकारी गाडीत होतो व आमचे सोबत पंच होते. आम्ही वाहनात होतो त्यावेळी धिंदळे यांचे लॅपटॉपवर टाईप करत होते. आमची स्कॉपीओ गाडी होती व मी चालक होतो. धिंदळे माझ्या शेजारी बसून होते. मधल्या शिटावर आरोपी व आमचे कर्मचारी बसले होते व पाठीमागे पंच बसले होते. हे म्हणणे खरे आहे की, आण्णा आहेर राहणारा चांदवड येथील आहे. आण्णा आहेर कार्यालयात सव्वा बारापर्यंत आला होता. हे म्हणणे खरे आहे की, नाशिकला जाउन तात्काळ फिर्याद दिली नव्हती. साक्षीदार सांगतो की, सर्व झाल्यानंतर फिर्याद दिली होती. नमुन्याकरीता वेगळया काढलेल्या बॉटलचा वेगळा पंचनामा केला नव्हता.

६. मी चालक असल्याने लॉगबूकला नोंद घेतली होती. तो उतारा धिंदळे यांना दिला होता. मी स्वतःहून उतारा दिला होता. लॉगबूकमध्ये गाडीच्या किलोमीटरची नोंद घेतली होती. त्यावेळी तेहत्तीस हजार व काहीतरी आकडा होता. मला निश्चीत आकडा सांगता येत नाही. मी परत गेल्यानंतर लॉगबूकला नोंद घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दिल्यानंतर तपासीक अधिका–याने मला बोलावले असे झाले नव्हते.

७. मी मूददेमाल रासायनिक पृथ्थकरणाकरीता घेउन गेलो होतो. माझा जबाब त्यावेळी नोंदविला होता. मुददेमाल माझ्याकडे हस्तातरीत करण्यापूर्वी तो के.पी. धिंदळे यांच्या ताब्यात होता. मुददेमाल मला दि. ३१/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता दिला होता. मुददेमाल रासायनिक परीक्षणाकरीता दिला त्याबाबत त्यांकार्यालयाकडून

निशाणी २१ वरील पावती घेतली होती. सदर पावती मी धिंदळे यांना दिल्याबाबत त्यांचेकडून पावती घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मुददेमाल आज न्यायालयासमोर हजर नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुददेमाल जागेवर कधीही मिळून आला नव्हता व म्हणून त्याचा जागेवर पंचनामा केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी जागेवर मिळून आला नव्हता म्हणून त्याचा जागेवर अटक पंचनामा केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सदर मुददेमाल आम्हाला बेवारस मिळून आला होता व म्हणून आम्ही दूस–या ठिकाणी जाउन पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मुददेमाल मिळून आला नव्हता व आमचे साहेबांना मदत व्हावी म्हणून मी खोटी फिर्याद दिली आहे.

८. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात कथन केलेला संपूर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोंपींचा घटनेशी काही एक संबध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी उशीराने फिर्याद दिली आहे.

९. दुस–या आरोपीला अटक केल्यानंतर तपासीक अधिका–याने मला बोलावून माझा जबाब घेतला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद उशीराने दिली व तपासीक अधिका–याला मदत व्हावी म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

## उलटतपास संपला.

## फेरतपास काही नाही.

**प्रमाणपत्र : – सदर साक्ष घेतेवेळी आरोपींना न्यायालयातील आवाज ऐकु जात होता व आरोपींचा आवाज न्यायालयाला ऐकु येत होता याची खात्री करण्यात आली व साक्षीदाराची साक्ष आरोपीचे उपस्थीतीत व्हीडीओ कॉन्फरसींगव्दारे** (https://meet.google.com/kpq–avxj–rwm?authuser=0&pli=1 **नोंदविण्यात आली.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.03.13 14:02:11 +0530

**दि. १३/०३/२०२६**

**(एस. एस.छल्लाणी)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी चांदवड.**